क्रमांक एफएलडी. १९८१/२०२५/फ-३,
महसूल व वन विभाग, मंत्रालय,
मुंबई-४०००३२, दिनांक ३१ मे १९८५.

विषय:- वन जमिन : पुणे

सर्वे नं. ८१ (हनुमान टेकडी) भांबुर्डा-
सिंबॉयसिस, पुणे या संस्थेस भाडे पट्टयाने
दिलेल्या जमिनीबाबत --

ज्ञापन:-

मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना त्यांच्या वरील विषयाच्या संदर्भीच्या क्र. कक्ष/१२/जमीन/पुणे/१८/(७८)/जावक/८४-८५, दिनांक २५/४/८४ व क्र. कक्ष/१२/जमीन/पुणे/८४-८५/९-ओडब्ल्यु, दि. २५/४/१९८४ च्या पत्रांना अनुलक्षून असे कळविण्यात येते की मुख्य वनसंरक्षकांच्या वर उल्लेख केलेल्या पत्रात नमूद केलेल्या एकंदर परिस्थितीचा विचार करून शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

(१) शासन पत्र महसूल व वन विभाग क्र. टीआरएल. १८७३/७३८४२-फ-६, दिनांक ७/१०/१९७५ मधील आदेशानुसार स. नं. ८१ भांबुर्डा, जिल्हा पुणे मधील एकूण ३.२६ हेक्टर वन जमीन सिंबॉयसिस, पुणे या संस्थेला इमारती बांधण्यासाठी काही अटींवर भाडेपट्टयाने देण्यात आली होती आणि त्यापैकी ज्या ०.८४ हेक्टर वन जमिनीचे निर्वनीकरण करून ती सिंबॉयसिस संस्थेला लॉ कॉलेज बांधण्यासाठी देण्याकरता महसूल विभागाकडे हस्तांतर करण्याचे आदेश शासन ज्ञापन महसूल व वन विभाग क्र. एफएलडी. १९७४/२५२२६५-फ-३, दिनांक ९/३/१९७८ मध्ये देण्यात आले होते, त्या ०.८४ हेक्टर वन जमिनीचे निर्वनीकरणाचे आदेश तसेच ठेवून फक्त सदर ०.८४ हेक्टर क्षेत्र सिंबॉयसिस या संस्थेला लॉ कॉलेजसाठी देण्याकरता महसूल विभागाकडे हस्तांतर करण्याबाबतचे आदेश रद्द करण्यात यावेत.

(२) वरील (१) मध्ये उल्लेखिलेले व निर्वनीकरण झालेले स. नं. ८१ भांबुर्डा मधील ०.८४ हेक्टर क्षेत्र ज्याची सिंबॉयसिस या संस्थेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती विहारासाठी मागणी केली आहे, सिंबॉयसिस या संस्थेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती विहारासाठी नेहमीच्या शर्ती/खालील शर्तींवर देण्यात यावे.

शर्त क्र. (एक) :- या क्षेत्राभोवती संस्थेने भिंत बांधून पक्के कंपाउंड करावे.

शर्त क्र. (दोन):- जास्तीत जास्त १० टक्के जमिनीवरच बांधकाम करण्यात यावे, बाकी जमिनीचा उपयोग उद्यान/वनीकरण यासाठीच करण्यात यावा.

शर्त क्र. (तीन):- या क्षेत्रावरील बांधकामाचा आराखडा पुणे महानगरपालिकेकडून मंजूर करून घेण्यात यावा व त्यांची मंजूर प्रत मुख्य वनसंरक्षकांमार्फत शासनास देण्यात यावी.

(३) सिंबॉयसिस या संस्थेला भाडेपट्टयाने देण्यात आलेल्या स. नं. ८१ भांबुर्डा मधील ३.२६ हेक्टर क्षेत्रापैकी वरील (२) मध्ये उल्लेखिलेले ०.८४ हेक्टर क्षेत्र वगळता उरलेल्या क्षेत्रापैकी ज्या

24

क्षेत्रात सिंबॉयसिस या संस्थेने वृक्षारोपण केले आहे असे ०.६० हेक्टर क्षेत्र सिंबॉयसिस या संस्थेकडे वरील क्र.[१] मध्ये उल्लेखिलेल्या दि.७/१०/१९७५ च्या शासन पत्रातील अटी/शर्तीवर भाडेपट्ट्याने राहू द्यावे.

[४] सिंबॉयसिस संस्थेला भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या स.नं.८१ भांबुर्डा मधील ३.२८ हेक्टर क्षेत्रापैकी वरील [२] व [३] मध्ये उल्लेखिलेले ०.८४ हेक्टर व/०.६० हेक्टर क्षेत्र वगळता उरलेल्या क्षेत्रापैकी जेवढ्या क्षेत्रावर सिंबॉयसिस या संस्थेने पॅगोडा बांधला आहे ते क्षेत्र सिंबॉयसिस संस्थेला [illegible] भाडेपट्ट्याने देण्यात यावे. या पॅगोड्यात जाण्यायेण्यासाठी संस्थेच्या कंपाउंड लागून उत्तरेकडील बाजूने पायवाटीस अनुमती देण्यात यावी.

[५] वरील [२],[३] व [४] मध्ये उल्लेखिलेले क्षेत्र वगळता स.नं.८१ भांबुर्डा मधील भाडेपट्ट्याच्या स्थाने सिंबॉयसिस संस्थेच्या ताब्यात असलेले इतर/क्षेत्र वन विभागाकडे परत घेण्यात यावे.

२. मुख्य वनसंरक्षकांनी शासनाच्या वरील निर्णयाला अनुसरून पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ श्री. रा. मंकोकर ]
उप सचिव,
महसूल व वन विभाग.

प्रति, [संधारण],
मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे
वनसंरक्षक, पुणे वनवृत्त, पुणे
विभागीय वन अधिकारी, पुणे वन विभाग, पुणे
जिल्हाधिकारी पुणे
महालेखापाल, महाराष्ट्र १ नागपूर
कृषी व सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
व-६ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
व-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, [सिलेक्ट फाईल].